**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं.०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - थकित - २०२०/२०२०-२१/१२/वेतनपथक, पुणे दिनांक - १२ मार्च, २०२१

प्रति,

प्राचार्य,

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी,

शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

कुलसचिव,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

**विषय - सन २०१९-२० आणि २०२०-२१ या आर्थिक वर्षातील थकित देयके एचटीई सेवार्थ प्रणालीमार्फत तयार करुन सादर करणेबाबत.**

या विभागाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालये आणि अकृषी व अभिमत विद्यापीठे यांमधील शासन मान्य पदावर कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची विविध बाबींवरील थकित रक्कमांची माहिती एचटीई सेवार्थ या प्रणालीमध्ये भरुन ती या कार्यालयास सादर करावयाची आहे.

**अ. विविध बाबींवरील थकित रक्कमांचे प्रस्ताव -**

एचटीई सेवाथ प्रणालीमधून थकित रक्कमेचे देयक खाली नमूद केलेल्या ठिकाणी व वेळेत आपल्याला नमूद दिलेल्या दिवशी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह **Outer** च्या प्रिंट सह दोन प्रतीत सादर करावे.

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | १३/०३/२०२१ | प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी, पुणे सकाळी १०.३० वाजल्यापासून |
| २ | पुणे जिल्हा | १५/०३/२०२१ | |
| ३ | अहमदनगर | १६/०३/२०२१ | |
| ४ | नाशिक | १७/०३/२०२१ | |

सदरहू देयक तयार करतांना न्यायालयीन प्रकरणातील थकित रक्कम वगळता आपल्या महाविद्यालये/विद्यापीठामधील शासन मान्य पदावर कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची आपल्या

महाविद्यालयाकडून तसेच अकृषी व अभिमत विद्यापीठांसाठी सन २०१९-२० आणि सन २०२०-२१ या आथिक वर्षासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे फक्त अशाच कर्मचा-यांचे प्रस्ताव एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये सादर करावेत. जे शिक्षक व शिक्षकतर कर्मचारी सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त/मयत/सेवा सोडून गेलेले आहेत त्यांचे थकित रक्कमांचे प्रस्ताव ऑफलाईन पद्धतीने स्वतंत्ररित्या दोन प्रतीत सादर करावेत.

**आपल्याकडून सन २०१९-२० आणि सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठीचे थकित रक्कमांचे प्रस्तावामध्ये ७ व्या वेतन आयोगामध्ये उशीरा वेतननिश्चिती झाल्यामुळे जर फरकाच्या रक्कमा प्रस्तावीत केल्या असतील तर त्यांचा समावेश करण्यात येऊ नये.**

**ब) अर्जित रजा रोखीकरण -**

या विभागाच्या अधिपत्याखालील महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठातील ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या अर्जित रजा रोखीकरणाचे आदेश निर्गमीत केलेले आहेत परंतू अजूनही त्याचे प्रदान झालेले नाही अशा सर्व कर्मचा-यांची प्रस्ताव खाली जोडलेल्या विवरणपत्रामध्ये थकित रक्कमांचे प्रस्ताव ज्या दिवशी सादर करण्याबाबत कळविलेले आहे त्या दिवशी खाली नमूद केलेल्या कागदपत्रांसह सादर करण्यात यावेत. **यापूर्वी सदरहू प्रस्ताव सादर केलेले असतील तरीदेखील नव्याने प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.**

ए) या कार्यालयाने संबंधीत कर्मचा-याच्या नावे काढलेल्या आदेशाची प्रत.

बी) लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी **६ व्या वेतन आयोगाचे दिलेले** अंतिम वेतन प्रमाणपत्र.

सी) देय असलेल्या रक्कमेचे परिगणन.

## STATEMENT 1

## STATEMENT SHOWING THE AMOUNT OF EARN LEAVE ENCASHMENT

Name of the College – College Code –

| S. N. | Name of the Employee | Designation | Date of Retirement | Order No. & Date | Amount Rs. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**ड) तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांचे मानधनाची रक्कम –**

आपल्या महाविद्यालयामध्ये तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांचे संबंधीत वर्षांमधील मानधनाची रक्कम अदा करण्याबाबत या कार्यालयास वारंवार विनंती करण्यात येत असते. त्यास अनुसरुन माहे फेब्रुवारी, २०२१ चे वेतनाबरोबर तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांचे मानधनाची रक्कम अदा करण्यासाठी किती रक्कम आवश्यक आहे त्याची माहिती सादर करण्याबाबत कळविलेले होते.

त्यास अनुसरुन याबाबत तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांचे मानधनाची रक्कम अदा करण्याबाबतचे प्रस्ताव  सादर करण्याबाबत ज्या सूचना दिलेल्या आहेत त्या विचारात घऊन त्याप्रमाणे वीत विवरणपत्रांमधील प्रस्ताव सर्व कागदपत्रासह थकित रक्कमांचे प्रस्ताव ज्या दिवशी सादर करण्याबाबत कळविलेले आहे त्या दिवशी सादर करण्यात यावेत.

तरी वर नमूद कलेल्या सूचना विचारात घेऊन आपले उपरोक्त बाबींचे प्रस्ताव आपणास नेमूद केलेल्या ठिकाणी, वेळेत व दिनांकास सादर करावेत.

आतापर्यंत न प्राप्त झालेल्या सर्व बाबींवरील रक्कम प्रस्तावीत करण्यात यावी.  सदरहू प्रस्तावामध्ये फक्त देय असलेल्या रक्कमेचाच समावेश करावा ज्या रक्कमा संबंधीतांना देय नाहीत त्यांचा समावेश करण्यात येऊ नये.

**सही/-**
(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे